MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA ®

Special Issue Vol - 02 September 2019

Impress
Impactful Policy Research in Social Science

Indian council of social science research

Government of India
Ministry of Human Resource Development

Sponsored

One Day Interdisciplinary National Level Seminar on

# SELF HELP GROUPS AND SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN

Friday, 27th September, 2019



Organized By

Department of Economics
Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's
**SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
Deulgaon Raja, Dist.Buldhana- 443 204.
NAAC Re-accredited at 'B' Level

Scanned with OKEN Scanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

Special Issue-02, September 2019

Indian council of social science research

Impress
Impactful Policy Research in Social Science

Government of India
Ministry of Human Resource Development

One Day Interdisciplinary National Level Seminar

on

## SELF HELP GROUPS AND SOCIO-ECONOMIC EMPOWERMENT OF WOMEN

Friday, 27th September, 2019

**Organized By**

Department of Economics

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

**SHRI VYANKATESH ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**

Deulgaon Raja, Dist.Buldhana- 443 204.

NAAC Re-accredited at 'B' Level

Editor

**Dr. Dnyaneshwar Gore**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

Date of Publication
27 Sept. 2019

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www.विद्यावार्ता.कॉम

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Chief Editor **Dr. Gholap B. G.**

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary.

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 6.021 Iijif

Cosmos IMPACT FACTOR 5.234

Govt. of India, Trade Marks Registry Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

# Index

01) सूक्ष्म वित्त व महिलांचे सबलीकरण ||14
डॉ. रामदास यशवंतराव माहोरे, नागपूर

02) बचत गट आणि महिला सक्षमीकरण ||19
डॉ. आर. बी. भांडवलकर, यवतमाळ

03) महिला बचत गट :महिला सबलीकरणाचा शाश्वत मार्ग ||23
प्रा.डॉ. शिवाजी पाते, परभणी

04) महिला बचत गट: महिला आर्थिक सबलीकरणाचे प्रभावी प्रतिमान ||26
प्रा. पी. एस. मिसाळ, प्रा. डॉ. डी. बी. खरात, जालना.

05) महिला स्वंयसहायता बचतगट एक दृष्टीक्षेप ||30
डॉ. विजय हिम्मतराव नागरे, बुलडाणा

06) स्वयंसाहाय्यता बचत गट — बुलडाणा जिल्हा एक दृष्टीक्षेप ||35
प्रा.डॉ.राजेंद्र निंबा बोरसे, लोणार

07) ग्रामीण महिला उद्योजकता विकासात महिला बचत गटाची भूमिका ||38
प्रा.डॉ. नरेंद्र हरीभाऊ शेगोकार, बुलडाणा

08) महिला सक्षमीकरणात बचत गटाची भूमिका ||40
Dr. Sanjay P. Kale, Walgaon

09) हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची—स्पर्धात्मक नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना सादरीकरण ...
प्रा. हरिष तुकाराम साखरे, बुलडाणा ||43

10) महिला सबलीकरणात स्वयंसहायता बचतगटांची भूमिका
डॉ. दास डी. के., बीड ||47

11) भारतातील महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता गटांची भूमिका
प्रा.डॉ. दिलीप पांडुरंग महाजन, बुलडाणा ||51

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03



Scanned with OKEN Scanner

11

# भारतातील महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता गटांची भूमिका

**प्रा.डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एस.पी.एम.तात्यासाहेब महाजन कला वाणिज्य
महाविद्यालय, चिखली जि.बुलडाणा

***********

**प्रस्तावना :—** भारतीय समाजात पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव असून महीलांना दुय्यम स्थान दिले आहे. सामाजिक दृष्टीने स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून महीलांचे स्थान उंचावण्याच्या कार्याला दिशा दिली आहे. भारतीय महीलांना आपले कर्तृत्व सिध्द करण्याची संधी मिळू लागली आहे. भारतीय आर्थिक नियोजनात आजतागायत गरिबी निर्मुलन व रोजगांरावर भर आहे. जागतिकीकरणाच्या काळात सहकाराला घरघर लागली असून स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून एक आशेचा किरण महीला सक्षमीकरणासाठी दिसून येत आहे. महीला संयमी व धाडसी असतात. मानवी जीवनाचा मुलाधार म्हणून सहकाराकडे पाहीले जाते. प्राचीन काळापासून मानवाने जी प्रगती साध्य केली त्यामागे सहकारच आहे. सहकार हे विश्वव्यापी विकासाचे साधन आहे. भारतानेही सहकाराची कास धरूनच ग्रामीण विकासाबरोबरच आर्थिक विकासाचे ध्येय साध्य करण्याचे अंगीकारले आहे. हयाच सहकारी तत्वावर आधारित बाग्लादेशात स्वयंसहाय्याता बचत गट उदयाला आला. या प्रस्तुत शोध निबंधात "भारतातील महीला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गटांची भूमिका" स्पष्ट करण्याचा थोडक्यात प्रयत्न शोधनिबंधकाराने केला आहे.

**संकल्पना "स्वयंसहाय्यता गट" :—** ज्यात प्रामुख्याने समानप्रश्न,सारखे आचार—विचार,समानमते व परस्पर जवळीक असणारे स्त्री—पुरूष एकत्र येतात व नियमित बचतीच्या माध्यमातून छोटया मोठया आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगिण विकास साधतात त्यांस "स्वयं सहाय्यता गट" म्हणतात.

एकाच वाडी किंवा वस्तीवरील एकाच सामाजिक, आर्थिक स्तरांमधील समविचारी,समान गरजा असणाऱ्या १० ते २० महीलांच्या संघटनास "स्वयंसहाय्यता गट" असे म्हणतात.

परिस्थीतीजन्य परावलंबनाकडून परिश्रमपूर्वक स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वत:च्या क्षमतांच्या सुयोग्य उपयोग करून, समुहातील सकारात्मक सहमतीने बचतीच्या हेतूने महीलांनी केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसहाय्यता गट होय.

"जिवनातील नव्या नव्या आव्हानांना व जबाबदाऱ्यांना पेलण्यासाठी क्षमता विकसित करणारा सुसज्ज संच म्हणजे" स्वयंसहाय्यता गट होय.

**संशोधनाची उद्दीष्टे :—**

१. महीला आर्थिक विकासाची संकल्पना समजून घेणे.
२. महीला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गटाच्या भुमिकेचा अभ्यास करणे.
३. भारतातील महीला स्वयंसहाय्यता गटाचे कार्य अभ्यासणे.
४. स्वयंसहाय्यता गटांच्या आर्थिक दृष्टीकोनाचा शोध घेणे.
५. महीलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यात प्रकाशित अप्रकाशित पुस्तके, ग्रंथ, लेख, मासिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे, वार्षिकांक, प्रगती अहवाल, वेब साईट इत्यादींचा आधार घेऊन विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून विश्लेषण करण्यात आले आहे व त्या आधारे निष्कर्ष काढून शिफारशी करण्यात आलेल्या आहेत व माहिती गोळा केलीत आहे.

**स्वयंसहाय्यता गटाची गृहीतके :—**

महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता महीला गटाचे महत्वपूर्ण योगदान आहे. या गटांमुळे महीलांच्या

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Publication | September 2019 Special Issue 02 | 052

आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व राजकीय विकासातील सहभाग वाढला आहे. स्वयं सहाय्यता महीला गटांमुळे महीलांचे नेतृत्व विकासाला हातभार लागला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :—**

१. प्रस्तुत संशोधन ग्रामीण भागातील बचत गटांशी संबंधीत आहे.

२. संशोधनासाठी ग्रामीण भागातील बचत गटांची निवड करण्यात आली आहे.

**मर्यादा :—** प्रस्तूत संशोधन ग्रामीण भागातील मिळालेल्या माहितीच्या बचत गटांपुरतेच मर्यादित आहे.

**स्वयंसहाय्यता गटांचा इतिहास :—**

सुक्ष्मवित्ताचे बिज डॉ.मुहंम्मद युनुस यांनी बांग्लादेशातील " जोबरा" (जाबेस) या गावात रोवले. गरीबांच्या बचतीतून १९८३ मध्ये अधिकृत ग्रामीण बँक अस्तित्वात आली. त्याच्या यशाची प्रचिती पाहुन सर्वच देशांनी त्यांचा अंगिकार केला . त्यामूळेच डॉ. मुहंम्मद युनूस यांना "सुक्ष्म वित्ताचे जनक" म्हटल्यास वावगे ठरणार नाही. असे असले तरी भारतात ही पध्दती त्याही पूर्वीपासून भिसी, चिटफंड रूपात अस्तित्वात होती याच सुक्ष्मवित्ताचे इ.स.१९९५ पासून भारतात बचत गटाच्या योजनेच्या रूपाने विस्तार व विकास झाला.

**महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता गटांची भूमिका :—**

भारतात ३४ लाख ७८ हजार बचत गट असून ४.५ कोटी महीला यात सहभागी आहेत. त्यातील उलाढाल १८ हजार कोटी रू आहे. आंध्रप्रदेश बचत गटाच्या बाबतीत अग्रेसर असुन त्या खालोखाल तामिळनाडू, महाराष्ट्र राज्यात आजपर्यंत जवळपास १.८.५ लाख बचत गट सक्षमपणे कार्य करीत आहेत. स्वयं सहाय्यता गटांच्या उद्दीष्टांमध्ये महीला सबलीकरण करणे हे एक महत्वपूर्ण उद्दीष्ट आहे. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून अर्थपूरवठा करून महीलांना आर्थिक पाठबळ दिले जात आहे. भारतात महीला सक्षमीकरणासाठी १ एप्रील १९९९ पासून 'सूवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना' सुरू करण्यात आली आहे. महीला आर्थिक विकास महामंडळ व स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमाने ही योजना राबविण्यात आली आहे.

स्वयं सहाय्यता गटामधील महीला ... चळवळ ही महत्वाची आहे कारण महीला गट ... महीलांची सक्षम करणारी प्रमुख यंत्रणा बनली आहे. ग्रामीण महीलांना अडीअडचणी, आचार— विचारांची देवाण घेवाण करण्याचे स्वयं सहाय्यता गट ... व्यासपीठ बनले आहे. महीलांच्या विकासात स्वयं सहाय्यता गटाची भूमिका महत्वपूर्ण आहे. महीला स्वयं सहाय्यता गटाच्याव्दारे अधिक संघटीत ... असून विविध कला कौशल्य व ज्ञान आत्मसात करण्याची जिद्द निर्माण झाली आहे. परिणामी कुटुंबात व समाजात महीलांचा दर्जा वाढला स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून अनेक आर्थिक, सामाजिक, उपक्रम सुरू करण्यात आले बचत करतांना महीला एक दुसरीच्या व्यथा समजून घेतानाच गावाच्या समस्यांविषयीही चर्चा करू लागली आहेत. एकजूटीने समस्या सोडवू लागल्या आहे. व त्या सोडविण्यात त्यांनी यश प्राप्त केले आहे.

महीलांच्या सक्षमीकरणासाठी 'महीला आर्थिक विकास महामंडळाची 'स्थापना' आंतरराष्ट्रीय महीला वर्षाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी १९७५ ला केली. पायाभूत विकास प्रक्रीयेतून महीलांसाठी सामाजिक, आर्थिक, न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्थापलेल्या महामंडळाला शासनाने महीला विकासाची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून २० जानेवारी २००३ घोषीत केले.

महीलासक्षमीकरणासाठी महीला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हाकार्यालया मार्फत स्वयं सहाय्यता गटावर आधारित महाराष्ट्र ग्रामीण पतपूरवठा कार्यक्रम, रमाई सक्षमीकरण योजना, राष्ट्रीय समविकास योजना यासारख्या योजनांची अंमल बजावणी केली जाते

महाराष्ट्रातील ३३ जिल्हयातील १३०३६ गावांत ३ लाख २६ हजार बचत गट असून १,१५,१९७ महीला गट आहेत स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महीला आर्थिक विकास महामंडळाचे कार्य महत्वाचे मानले जाते. तेजस्विनी महीला सक्षमीकरण कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या वतीने २००७ पासून



Scanned with OKEN Scanner

मंजुर केला आहे महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून चाललेले प्रयत्न महत्वपुर्ण ठरतात. ७७७८८बचत गटांनी व्यसवसाय सुरू केले असून यात ३७ लाख महीला काम करीत आहेत यात ७.५०० कोटी रू गुंतवण्यात आले आहे. विदर्भातील चंद्रपूर जिल्हयात सर्वाधिक १८ हजार बचत गट असून अमरावती जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. प्रत्येक बचत गटात १० ते २० या सरासरीने ४ कोटी महीला बचतगट चळवळीत सक्रीय आहेत एस.बी.आय ने ६५० शाखांमधून ९१४ कोटी रू.चे बचत गटांना कर्ज वाटप केल्याचे आढळते.

**सुवर्ण जयंती ग्राम स्वंय रोजगार योजनेच्या माध्यमातून विदर्भातील स्वयंसहाय्यता बचत गटांची कामगिरी**

| अ. क्र | जिल्हा | बचत गट संख्या | महीला बचत गट संख्या | व्यवसाय सुरू केलेले गट | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण गट | महीला गट |
| १ | बुलडाणा | ६,६८३ | ३,०५१ | ४,८१२ | ५४४ |
| २ | अकोला | ५,४७६ | ४,३११ | १,१०७ | ७९५ |
| ३ | वाशिम | २,९३३ | २,१४७ | २,१८८ | ६४९ |
| ४ | अमरावती | ८,५१२ | ६,९९७ | ६,२९० | १,४३१ |
| ५ | यवतमाळ | ६,४६८ | २,८६० | ३,२३२ | १,५५५ |
| ६ | वर्धा | ३,४७२ | २,७६९ | ९५७ | ६०० |
| ७ | नागपूर | ४,२२५ | २,६३८ | ८६५ | ६६९ |
| ८ | भंडारा | ४,३८५ | ३,८५६ | २,२७२ | ७९५ |
| ९ | गोदींया | ५,७५५ | ४,५२१ | ४,४७० | ९०७ |
| १० | चंद्रपूर | ३,७६७ | ३,२५६ | १,२२९ | १,१७१ |
| ११ | गडचिरोली | ३,३५९ | ३,०४९ | २,८३१ | ८०८ |

**स्वयं सहाय्यता बचत गटाच्या कार्याचा आढावा**

१. ग्रामीण महीला रोजगार निर्मीतीसाठी प्रयत्नशिल असून आळस झटकून त्यांनी प्रगतीचा मार्ग स्विकारला आहे एम्ब्रा यडरीचा वापर करून सुबक, आकर्षक काम, गोधडी शिवण्याचे तंत्रशुध्द प्रशिक्षण रजई, दुलई, पेटींग काम घेऊन रोजगार व उत्पन्न मिळवून त्या स्वयंनिभर होत आहेत.

२. बचत गटांमुळे आर्थिक मदत झाली, आजार, शिक्षण, लग्न कार्यासाठी आर्थिक मदत केली जाते. राजगिरा लाडु, तिळीचे लाडू, कुरडया, लाहया, तांदुळ पापड, मिरची पावडर, खारे शेंगदाणे, हळद पावडर इत्यादी तयार करून त्याच्या विक्रीतून चांगले उत्पन्न मिळवत आहे.

३. स्वयं सहाय्यता गटांमुळे जीवनाला स्थिरता आली आहे. स्वयं सहाय्यता गटामुंळे सततचे करावे लागणारे स्थलांतर टळले आहे. गावरान मुळाची विक्री, प्रदर्शन यामुळे नफा सर्व सदस्यांना वाटुन दिला जातो. महीलांना शिक्षण व बचतीचे महत्व समजू लागले आहे.

४. महीला उत्कृष्ट व्यावसायिक बनल्याने त्यांनी स्वयं सहाय्यता गटांमार्फत उत्कृष्ट पॅकींगमधील व स्वकष्टातुन उत्पादीत तांदूळ प्रदर्शनातून, विक्रीतून व्यवहारात तरबेज होऊन, संवाद साधून चांगला रोजगार व उत्पन्न मिळवित आहे व कुटूंबाच्या आर्थिक उन्नतीला हातभार लावत आहेत.

५. ग्राहक आकर्षित करणारे गट निर्माण झाले आहेत. रंगीत कपडे, आभुषणे या वस्तुंच्या विक्रीतून उत्पन्नाच्या आर्थिक प्रगतीसह उत्पन्न वाढीला हातभर लावण्यासाठी स्वयंसहाय्यता गट उत्तम पर्याय आहे.

६. कला — कौशल्य विकसित करून ग्राहकांना आपला माल विकण्याचे तंत्र महीलांनी आत्मसात केल्याने बाजार, प्रदर्शनात, यात्रेत, सहभागी होऊन आर्थिक प्राप्ती करून स्वाभिमानी बनत आहेत.

७. स्वयंसहाय्यता गटांच्या साहय्याने तयार केली मॅजिक पर्स महीलांना भुरळ घालणारी ठरल्याने व्यावसायिकांनी पर्सची मागणी नोंदवली आहे. रेडीमेड स्वादिष्ट लिंबु शरबत, सुगंधी उटणे तयार केले यातून चांगले उत्पन्न मिळत आहे.

८. बचत गटाला दुग्ध व्यवसाय, अंगणवाडी पूरकपोषण आहार, कुरडया, चकल्या, गव्हाचा चिवडा, आभुषणे इत्यादी साहित्य विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नातून बचत करण्याची सवय लागली व आत्मविश्वास वाढून कुटूंबांची प्रगती होत आहे.

९. सेंद्रीय शेतीच्या प्रयोगासाठी काही महीला उत्पादकांनी कापसाची उत्पादकता वाढीसाठी उत्पादन खर्च कमी करून जमीनीचा पोत सुधारण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे रोजगार व उत्पन्न मिळण्यासही मदत झाली.

१०. साक्षरतेचा मंत्र घेतला व तो पुर्णत्वास नेल्याने हिशेब व कागद पत्रांवर सहया करू लागल्याने इतर ही निरक्षर सभासदांना साक्षर करण्याचा मंत्र उचलला तोही स्वयं सहाय्यता गटाव्दारा केला गेला .



Scanned with OKEN Scanner

११. स्वयं सहाय्यता बचत गटांव्दारा ७ हजार कोटी रूपयांची बचत केली गेली. याव्दारा ३.५ कोटी महीला एकत्रित येऊन या गटांव्दारे ३०० कोटी रूपयांची बचत केली व महीला स्वत:च्या पायावर उभे राहील्यात. गटांना नाबार्ड मार्फत कर्ज पुरवठा २२२७८ कोटी रूपये केला गेला. यातून महीलांनी स्वयं रोजगार, लघुउद्योग, गृहउद्योग, कुटीर उद्योग सुरू केले व महीलांचा आदरभाव वाढला.

१२. स्वयं सहाय्यता गटाव्दारे विविध उद्योगाव्दारे महीलांना आर्थिक उन्नतीचा मार्ग सापडला असून त्याव्दारे दुग्ध व्यवसाय, शेतीवर आधारित उद्योग, पशुपालन, पिठगिरणी, भातगिरणी, किराणा दुकान, विट भटटा, कांदा कटटा, कृषी सेवा केंद्र, सामुहीक शेती गटांव्दारे केली जात आहे.

१३. स्वयं सहाय्यता गटांव्दारा महीलांचा आत्मसन्मान वाढला गटांनी महीलांना जिद्द व परिश्रमाची जोड दिल्याने महीला आत्मनिर्भर व स्वावलंबी बनल्या आर्थिक फायदया बरोबरच सामाजिक सुरक्षितता व कुटूंब,समाजात मान सन्मान प्राप्त होत आहे.

१४. स्वयं सहाय्यता बचत गटांनी श्रमदानातून एक मातीचा बांधपुर्ण केला. दगडाची पिचिंगचे कामही पूर्ण केले. काही गटांनी जलसंधारणाच्या कार्यातही सहभागी होण्याचा संकल्प केला. पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमालाही हातभार लावला व पाणी अडविण्यासाठी श्रमदानातून बांध बांधला.

१५. महीला गटांव्दारा धान्यकोष स्थापला गेला. ज्वारी वाळवून, स्वच्छ करून, कणगीत साठविले, धान्याला किड लागू नये म्हणून कडु लिंबाचा पाला टेवला कणगीचे तोंड शेणाने बंद करून जमा धान्याची नोंद लेख वहीत घेतली व नंतर गरजू सभासदांना वाटले यामूळे कुपोषण कमी होऊन सावकारी पाशातून कुटूंबांची सुटका झाली .

१६. स्वयं सहाय्यता गटाव्दारे मका, कापूस व जंगली झाडांपासून अनोखे ड्रायफ्लावर तयार करण्यात येऊन त्याला मागणी वाढली.

१७. धान्यापासून मदय निर्मितीला महीला स्वयं सहाय्यता गटाचा विरोध होता. त्यामुळे महीलांमध्ये जाणीव जागृती वाढली होती असे जाणवले.

१८. स्वयं सहाय्यता गटातील महीलांनी घरच्या स्थितीवर चिंता करण्यापेक्षा कष्ट व चिकाटीतून प्रगती साधण्यासाठी संघटीतपणे काम करण्याचे ठरविल्याने गटाची प्रगतीकडे वाटचाल आहे.

१९. स्वयं सहाय्यता गटातील महीलांनी मोटार सायकलच्या बॅटरीवर चालणारे पवन अग्नी शेगडी चे नव उत्पादन इंधन व गॅस बचतीला पर्याय ठरून पत्र्याला चुलीचा आकार देऊन बॅटरीला जोडून शेगडी तयार केल्यास बॅटरी सुरक्षीत राहील. अन्न शिजविण्यासाठी ज्वाला नियंत्रणासाठी पंख्याचे रेग्युलेटर लावून शेगडीच्या एका भागाला कोळसा टाकून गृहीणी अन्न शिजवू शकते बॅटरीला चार्जिंग सुविधा असल्याने शेगडीचा वापर कीतीही वेळा करता येतो त्यामुळे गटाला नविन्यपूर्ण उत्पादनाने चांगले उत्पन्न लाभत आहे.

२०. स्वयं सहाय्यता गट सदस्यांनी स्वत:चे घरकुल साकारंण्याकडे वाटचाल सुरू केली आहे. गटांच्या सहाय्याने कष्टाला आकार देवून, कष्ट चिकाटीतून हिमतींने समर्थपणे मुकाबला करण्याचा निर्धार करित आहेत.

२१. स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून स्वत:चा चरितार्थ चालविण्यास मदत होत आहे. त्याव्दारे दाळया, फुटाणे, शेंगदाणे, गव्हाचा चिवडा ही उत्पादने पॅकींग करून विक्री करत आहेत.

२२. स्वयं सहाय्यता गटाव्दारा चाणाक्षपणे व्यवहार, व्यवस्थापन, आत्मविश्वासाने किराणा दुकान, कटलरी, सौंदर्य प्रसाधने विक्रीतून दोन पैसे हाताशी राहु लागल्याने पैसे उसनवार मागण्याची गरज कमी झाली आहे.

२३. स्वयं सहाय्यता गटाव्दारे लहान उद्योग व्यवसाय सुरू करून त्यांच्या विक्री व्यवस्थापनातून महीलांनी भरारी घेतली आहे.

२४. स्वयं सहाय्यता गटांच्या माध्यमातून महीलांना सक्षमीकरणाच्या वाटा खुल्या होऊन सुरक्षितता व आरोग्याला महत्व देण्यात येत आहे. गट सदस्य महीलांचा आरोग्य विम्याच्या माध्यमातून आरोग्याशी मैत्री करून विम्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहण्याच्या दृष्टी कोण विकसीत झाला आहे.



Scanned with OKEN Scanner

२५. स्वयं सहाय्यता बचत गटांनी बि–बियांणे, किटकनांशके, खते विक्रीचे दुकान सुरू केल्याने प्रगतीस वाढ झाली आहे.

२६. स्वयंसहाय्यता बचत गटांव्दारे महीलांनी विकसित केलेले तंत्रज्ञान अंडी उबविण्याचे यंत्र उपलब्ध करून देण्यात आले. त्याबाबत प्रशिक्षणही देण्यात आले त्यामूळे गटांच्या महीलांना रोजगार मिळून त्यांचे उत्पन्न वाढीला मदत झाली.

महीलांच्या विकासासाठी स्वयं सहाय्यता गटांव्दारे आत्मविश्वास, आर्थिक स्वावलंबन निर्माण होत असले तरी गटांसमोर काही समस्याही येतात.

१. महीलांमध्ये संभाषण कौशल्याचा अभाव जाणवला.
२. महीला सभासदांमध्ये मत भेद जाणवले.
३. महीला महीलां सहकाऱ्यांमध्ये सहाकार्याचा अभाव दिसून आला.
४. महीला गटांमध्ये पुरूषांचा हस्तक्षेप अधिक दिसून आला.
५. काही प्रमाणात गटांमध्ये राजकीय हस्तक्षेप जाणवला.
६. स्वयं सहाय्यता गटांची केवळ संख्यात्मक वाढ झाली मात्र गुणात्मक वाढीला चालना मिळतांना दिसून आली नाही.
७. स्वयं सहाय्यता गटांच्या हिशेबात पारदर्शकता आढळून आली नाही.
८. स्वयं सहाय्यता चालविणाऱ्या महीला अशिक्षित आढळल्या .
९. महीलांच्या विचारांत ऐक्याची भावना दिसली नाही.
१०.महीला सभासदांमध्ये स्वयं शिस्तीचा अभाव होता.
११.महीलांना कुटूंबातील विरोधामुळे आत्मविश्वासाचा आभार जाणवला.
१२.दारिद्रय रेषेवरील गटांना अनुदान नाही.
१३.गटांना सावकारी पाशाचा विरोध दिसला.
१४.केवळ सरकारी योजना म्हणून गटांची स्थापना झाल्यात.
१५.माल विक्रीची कायम स्वरूपी सोय नाही.

**उपाय :–**

१. स्वयं सहाय्यता बचत गटांमध्ये गुणात्मक वाढ होणे गरजेचे आहे.
२. उत्पादित माल विक्रीची कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.
३. गटांतील सभासदांना योग्य प्रशिक्षण मार्गदर्शन देण्यात यावे.
४. गटागंटामधील गैरसमज दुर करावेत.
५. गटांतील ही कामात पारदर्शकता ठेवावी.
६. सभासदांमध्ये ऐक्याची भावना रूजवावी.
७. संयम व चिकाटी राखून राजकीय हस्तक्षेप टाळावा.
८. स्वयं सहाय्यता गटाचा आर्थिक विकासाचे साधन म्हणून विचार व्हावा.
९. अनुदान देण्याचे मापदंड बदलावे.
१०.सभासदांनी परस्परांमध्ये आत्मियता व सहकार्याची भावना जोपासली पाहीजे.

**निष्कर्ष :–**

१. महीला गटांचा शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राशी संबंधीत जडणघडणीत सर्वाधिक वाटा आहे.
२. स्वावलंबित्व, आत्मविश्वास, यात वाढ झाल्याचे दिसुन आले.
३. पारंपारिक ज्ञानावर विश्वास नसणे, अपूऱ्या बाजाराच्या सोई, जाहीरातीचे कमी प्रमाणामुळे बाजारात समस्या उदभवल्या .
४. गुणवत्ता नियंत्रण व विकासाची जबाबदारीची जाणीव गटांच्या व्दारा दिसुन येते.
५. दुर्गम व ग्रामीण भागातील गटांबाबत अनास्था शासन दरबारी दिसते.

**शिफारशी :–**

१. महीला गट विषम समायोजन होऊ नये त्यात समतोल राखावा.
२. सदस्यांना आत्मनिरीक्षणाने गुणदोष निराकरणाची सवय विकसित करावी.
३. गटांना भुषणावह शक्ती केंद्र होऊन गट व शासनाच्या समन्वयातून सशक्त बाजारपेठ उभारावी.
४. आशावाद न सोडता कार्यमग्न राहुन महीला समुपदेशकांची गटांनी सेवा घ्यावी.



Scanned with OKEN Scanner

५. महीलांच्या पाल्यांना शिक्षणासाठी शासन व गटांच्या सहकार्याने विशेष शाळा असावी.
६. बचत गटांना साक्षरता व संगणक साक्षरता याची शासनामार्फत प्राधान्याने सोय उपलब्ध करून द्यावी.

**समारोप :—**

स्वयं सहाय्यता महीला बचत गट योजना समाजातील तळागाळातील जनता विशेषत: महीला आणि देशांसाठी फायदेशिर आहे कारण गरीबी व बेरोजगारी सारख्या समस्यांची तिव्रता कमी करण्यासाठी मदत होऊ शकते.

**संदर्भ सुची :—**


१. मानवी हक्क — प्रा.व्ही.बी.पाटील .
२. प्रबोधन प्रकाशन ज्योती .
३. महाराष्ट्र वार्षिकी .
४. अर्थसंवाद .
५. दै.लोकसत्ता, सकाळ, देशोन्नती, लोकमत, दिव्य मराठी, तरूण भारत.
६. लोकराज्य मासिक.
७. kshitij. क्षितीज —संशोधन पत्रिका
८. 'प्रतिबिंब'— महीला समस्यांचा आत्मशोध — अथर्व पब्लीकेशन, जळगांव.
९. NIIRJ – Research Journal प्रथमेश प्रकाशन, औरंगाबाद .


❑❑❑

**12**

# महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणात स्वयं—साहाय्यता बचतगटाचे योगदान


**डॉ. प्रशांत म. पिसोळकर**
सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विद्या शाखा प्रमुख, शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, अकोला.


==============***********=============


**सारांश**

समाजातील दुर्बल घटकांना एक आशेचा किरण म्हणून स्वयं-साहाय्यता बचतगटाकडे पाहिले जाते. बचत गटाचा दारिद्र निर्मुलनाशी जेवढा घनिष्ठ संबंध आहे तेवढाच महिला सबलीकरणाची आहे. जोपर्यंत महिलांचे सबलीकरण होत नाही, तोपर्यंत तिला समाजात खरी प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही. महिलांच्या सहभागाशिवाय देशाचा विकास होणार नाही, त्यामुळे महिलांच्या सबलीकरणावर भर दिला जात आहे यामध्ये स्वयं-साहाय्यता बचतगटाचे योगदान खूप मोठे आहे. स्वयं-साहाय्यता बचतगटाच्या माध्यमाने अनेक योजना राबवून महिला सबलीकरणाचे विविध प्रयत्न सुरू केले आहेत. स्वयं-साहाय्यता बचतगटाच्या माध्यमाने आपल्या आवडीचा व्यवसाय किंवा अंशकालीन नोकरी करता यावी जेणे करून त्या आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर होतील व या आर्थिक निर्भरतुन त्याचे सामाजिक, आर्थिक, राजकीय सबळीकरण होईल. या संकल्पनेतूनच स्वयं-साहाय्यता बचतगट ग्रामीण व शहरी भागात काम करीत आहे.त्याचे परिणाम आपल्याला आता दिसत आहे आणि म्हणून या महिला स्वयं-साहाय्यता बचतगटाचा अभ्यास करून त्याचा महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणात योगदान किती आहे समजणे, ही काळाची गरज आज झाली आहे.




Scanned with OKEN Scanner